# फेब्रुवारी महिन्याचा परिचय

१ फेब्रुवारी, २०२१

आत्मीय वाचक,

फेब्रुवारी महिन्यात सिद्धयोग मार्गावर आपले स्वागत आहे.

या महिन्यात साजऱ्या होणाऱ्या उत्सवांपैकी एक आहे, ‘संत व्हॅलेन्टाइन दिवस.’ सिद्धयोग मार्गावर ‘संत व्हॅलेन्टाइन दिवस’ हा दिवस एक संधी असतो, जेव्हा आपण गुरुमाई चिद्विलासानंद आणि बाबा मुक्तानंद यांनी प्रेमाविषयी आपल्याला दिलेल्या शिकवणींवर चिंतन करतो आणि या शिकवणी आपल्या जीवनात कार्यान्वित केल्यामुळे त्यातून आपल्याला जी समज प्राप्त झाली आहे, त्यावरही चिंतन करतो.

अचला हिच्याशी विवाहबद्ध झाल्यानंतरच्या सुरुवातीच्या काळात, मला आपल्या कृतींमध्ये प्रेम उतरवण्याविषयीच्या गुरुमाईंच्या शिकवणीवर चिंतन करण्याचा आणि ती आचरणात आणण्याचा एक शक्तिशाली अनुभव आला होता. अनेक वर्षांपूर्वी एकदा दर्शनाच्या समयी मी श्रीगुरुमाईंना नमस्कार करण्याकरता नतमस्तक होत असताना त्यांनी मला एक प्रश्न विचारला, “तू तुझ्या पत्नीची काळजी घेतो आहेस का?” हे ऐकताच मी आश्चर्यचकित झालो, आणि मग अचला किती सशक्त आहे हे दाखविण्याच्या विचाराने मी अभावितपणे बोलून गेलो, “नाही, गुरुमाई अचला स्वतःच स्वतःची काळजी घेते.” हे उत्तर खचितच फारसे चांगले नव्हते, आणि श्रीगुरुमाईंनी तोच प्रश्न पुन्हा एकदा विचारला —“तू तुझ्या पत्नीची काळजी घेतो आहेस का?” आणि मग मला अचानकपणे सुचलेले पुढील उत्तर मी पकडले, अशा विचाराने की त्यामुळे माझी श्रद्धा प्रदर्शित होईल : “गुरुमाई, अचलाची काळजी परमेश्वर घेतो आहे.” श्रीगुरुमाई माझ्याकडे लक्षपूर्वक पाहत राहिल्या आणि पुन्हा एकदा म्हणाल्या, “तू तुझ्या पत्नीची काळजी घेतो आहेस का?” याचा अर्थ कळायला मला कदाचित थोडा वेळ लागला असावा, पण आता मात्र मला यातला आशय लक्षात येऊ लागला होता, मी म्हणालो, “मी प्रयत्न करेन, गुरुमाई,” आणि त्यांना प्रणाम केल्यावर मी माझ्या जागी परतलो व त्यांच्या प्रश्नावर चिंतन करू लागलो.

मला याची जाणीव होऊ लागली होती की, मी फक्त स्वतःच्याच गरजांकडे नेहमी लक्ष देतो आहे, जणूकाही मी तिचा पती नसून केवळ रूममेट आहे आणि माझ्या हे लक्षात आले की, ही वेळ बदलण्याची आहे. मी यावर चिंतन करू लागलो की, अचलाची खरोखरच काळजी घेणे याचा अर्थ

काय असावा, आणि मग मला याची जाणीव झाली की, या काळजी घेण्यामध्ये तिच्यासाठी सूप बनवण्यापासून ते तिच्या अत्यंत व्यस्त जीवनातील सर्व दैनिक कार्यांमध्ये तिला मदत करण्यापर्यंतच्या सर्व गोष्टींचा समावेश आहे. मी तिच्या आवडीनिवडींबाबत आणि तिच्या चिंतांबाबत अधिक जागरूक झालो आणि तिच्या जीवनातील आव्हानात्मक प्रसंगी आणि आनंदाच्या समयीदेखील तिची साथ देण्याचा प्रयत्न करू लागलो.

कालांतराने, मला असे काहीतरी जाणवू लागले जे मला माझ्या जीवनात याआधी कधीच जाणवले नव्हते—मी माझ्या परमप्रिय मैत्रिणीशी आणि सहचारिणीशी अगदी हृदयापासून आणि मनापासून खोलवर जोडले जाण्यातील गूढ अनुभवू लागलो, आणि त्याबरोबरच हेदेखील की, आम्ही दोन निरनिराळ्या व्यक्तीही आहोत आणि आम्ही दोघे 'एकच' आहोत ही भावनादेखील अनुभवू लागलो.

कालपरत्वे आणि चिंतनाद्वारे, मी श्रीगुरुमाईंच्या प्रश्नाला आमच्या वैवाहिक जीवनात केंद्रस्थानी ठेऊन जेव्हा उत्तर शोधू लागलो, तेव्हा मला आणि अचलाला असे दिसून आले की, यामुळे आमच्यातील प्रेमाच्या अनुभवाला अधिक सखोलता प्राप्त होते आहे.

या सुंदर आणि आव्हानात्मक जगतात आपण कुठेही जरी असलो, तरी श्रीगुरुमाईंच्या शिकवणींवर चिंतन करत राहणे आणि सिद्धयोग अभ्यासांमध्ये नियमितपणे निमग्न होऊन राहणे या गोष्टी आपल्यापैकी प्रत्येकाचे सखोल पोषण करू शकतात. आपण जसजसे श्रीगुरुमाईंच्या शिकवणी आचरणात आणतो, तसतसे अगदी मनमोकळेपणाने आणि सहजपणे आपल्या कृतींमधून इतरांप्रति आपले प्रेम व्यक्त होते. आपल्या अस्तित्वाच्या गाभ्यामध्ये जे प्रेम आहे, त्याच्याशी अनुसंधान साधल्याने आणि ते प्रेम आपल्या कृतींमध्ये उतरवत राहिल्याने, या जगतात प्रेमाला प्रकट रूप देण्यात आपण सहभागी होतो.

***

फेब्रुवारी महिना 'संत व्हॅलेन्टाइन दिवसा'व्यतिरिक्त, आपल्याला संधी देतो, दोन महत्त्वाच्या भारतीय उत्सवांविषयी जाणून घेण्याची आणि ते साजरा करण्याची तसेच चीनी नववर्षाचे स्वागत करण्याची.

**गणेश जयंती : १५ फेब्रुवारी**

गजानन, भगवान श्रीगणेश हे नवीन आरंभांची एक देवता म्हणून संपूर्ण भारतात प्रिय आहेत, या महिन्यात हे उल्लेखनीय आहे कारण त्यांच्या जयंतीबरोबरच आपण इतरही दोन नवीन आरंभांचा उत्सव या महिन्यात साजरा करणार आहोत. भगवान श्रीगणेश हे विघ्नहर्ता आहेत आणि शक्ती व बुद्धीची देवता म्हणूनही ओळखले जातात. भगवान श्रीगणेशांचा एक हात अभयमुद्रेत असतो,

ज्याद्वारे ते आपल्या भक्तांना शांती व अभय प्रदान करतात. गणेश जयंती म्हणजेच भगवान श्रीगणेशाच्या जन्मोत्सवाची तयारी करण्यासाठी, तुम्ही सिद्धयोग मार्गाच्या वेबसाईटवरील श्रीगणेशाच्या कथा, भजने-अभंग, स्तोत्रे वाचू शकता व त्यांच्या छबींचे दर्शन घेऊ शकता व त्यांवर मननचिंतनही करू शकता.

**वसंत पंचमी : १६ फेब्रुवारी**

वसंत पंचमीच्या उत्सवादरम्यान, भारतात वसंत ऋतूच्या आगमनाचा उत्सव साजरा करत लोक देवी महासरस्वतीची पूजा करतात व तिची आराधना करतात. देवी महासरस्वती विद्या, संगीत, भाषा आणि कला यांची देवी आहे. सिद्धयोग मार्गाची वेबसाईट आपल्याला असे अनेक मार्ग प्रदान करते ज्यांद्वारे आपण देवी महासरस्वतीविषयी आपल्या ज्ञानामध्ये वृद्धी करू शकतो व तिच्या आशीर्वादांचे आवाहन करू शकतो.

**चीनी नववर्ष**

चीनी दिनदर्शिकेनुसार, हे वर्ष वृषभ [बैल] वर्ष आहे, जे या वर्षी १२ फेब्रुवारीला सुरू होऊन ३१ जानेवारी २०२२ला संपेल. जगभरातील अनेक देशांमध्ये लोक प्राण्यांच्या अनेक महान गुणांना जाणतात आणि त्यांचा सन्मान करतात—पाळीव प्राण्यांचा व जंगली प्राण्यांचाही—जे त्यांच्या जीवनाचे अंग बनलेले असतात. एक मार्ग जो चीनी लोक त्यांच्या जीवनात उपयोगी अशा या प्राण्यांचा सन्मान करण्यासाठी आणि ते प्राणी धारण करत असलेले गुण दर्शवण्यासाठी अवलंबतात, तो म्हणजे बारा वर्षांच्या चक्रातील प्रत्येक वर्षाला एका प्राण्याचे नाव देणे. त्या विशिष्ट वर्षात जन्म झालेल्या व्यक्ती त्या वर्षाला दिलेल्या प्राण्याचे महान गुण धारण करतात अशी मान्यता असते. उदाहरणार्थ, या वर्षी वृषभ [बैल] वर्ष आहे. वृषभ [बैल] वर्षामध्ये जन्मणाऱ्या व्यक्ती या त्यांच्यातील सहनशीलता, प्रामाणिकपणा, सकारात्मक स्वभाव आणि कार्यनीतीसंबंधी दृढ नैतिकता यांसाठी ओळखल्या जातात. त्यांचा विशेषकरून आदर केला जातो तो प्रकल्पांना पूर्णत्वापर्यंत नेण्याच्या त्यांच्या चिकाटीमुळे.

***

या महिन्यात मी तुम्हाला आमंत्रित करतो की, या महिन्यात थोडा विराम घ्या, आणि त्या प्रेमावर मननचिंतन करा जे तुमच्या स्वतःच्या अस्तित्वात जागृत झाले आहे आणि यावरही चिंतन करा की गुरुमाईंच्या शिकवणींचा अभ्यास केल्याने व त्या शिकवणी आचरणात आणल्याने तुमचे जीवन कशा प्रकारे रूपांतरित झाले आहे? एखाद्या व्यक्तीला तुम्ही कोणत्या गोष्टी सांगाल? कोणत्या आंतरिक प्राप्तींचा उत्सव तुम्ही साजरा कराल? तुमच्या कृतींमध्ये, विचारांमध्ये आणि शब्दांमध्ये निहित

असलेले कोणते प्रेम तुम्ही ओळखाल? आणि अशा प्रकारे चिंतन करून हे प्रेम व्यक्त करण्याच्या आणखी काही संधी तुम्ही कशा प्रकारे शोधाल?

माझ्या वतीने तुम्हाला आनंददायी, सुरक्षित आणि संतोषप्रद फेब्रुवारी महिन्यासाठी शुभेच्छा!

आदरपूर्वक,
पॉल हॉकवुड

© २०२१ एस. वाय. डी. ए. फाउंडेशन®. सर्वाधिकार सुरक्षित.